# आजपासून ऑनलाइन विश्व साहित्य संमेलन

**पुणे : प्रतिनिधी**

गाजावाजा झालेले टोरांटो येथील चौथे विश्व साहित्य संमेलन रद्द झाले असले तरीही ऑनलाइन बुकगंगा विश्व साहित्य संमेलनातून घरबसल्या साहित्य संमेलनाचा आनंद उपभोगता येणार आहे. माय विश्वच्या वतीने दि. ५ ते १५ सप्टेंबर दरम्यान ऑनलाइन संमेलन पार पडणार आहे, अशी माहिती मायाविश्व कार्पोरेशन उद्योगसमूहाचे मंदार जोगळेकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

याप्रसंगी विश्व साहित्य संमेलनाची घोषणा झाल्यानंतर ज्येष्ठ समीक्षक शंकर सारडा यांच्या हस्ते संकेतस्थळाचे औपचारिकरीत्या उद्घाटन करण्यात आले. यावेळी सुधीर गाडगीळ, धनंजय दातार व प्रकाश भोंडे उपस्थित होते.

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून साहित्याचा प्रचार करणे हा या संमेलनाचा उद्देश असून, जगभरातील साहित्यिक, वाचक व प्रकाशकांना यानिमित्ताने एक व्यासपीठ मिळणार आहे. या साहित्य संमेलनात फेसबुकच्या माध्यमातूनही सामील होता येणार असून, घरबसल्या चर्चासत्रे, कविसंमेलने, पुस्तक परिचय, विविध स्पर्धा यांचा आस्वाद घेता येणार आहे.

पुढील पन्नास वर्षांत मराठी भाषेचे स्थान काय असेल, मराठीसाठी मी काय करतो, भाषेचे राजकारण, असे विषय चर्चेसाठी असणार आहे. मराठीसाहित्याचीसंपूर्णमाहितीसंमेलनातूनमिळणार आहे. लेखक, पुस्तक, कविता, प्रकाशक, ब्लॉगर व वाचक यांच्यासाठी पुरस्कारही ठेवण्यात आले आहेत. साहित्य संमेलनात सहभागी होण्यासाठी www.vishwasahityasammelan.org ला भेट देता येणार आहे. संमेलनाचे वैशिष्ट्य म्हणजे स्थळनिश्चितीवरून वाद, मानापमान, आदी नकारात्मक गोष्टी यामध्ये नसतील, अशी माहिती यावेळी सांगण्यात आली.